# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/03/2023 (सोमवार) सकाळ

---

## मिरची चोरी करणारे आरोपी गजाआड

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत १३ कि.मी. अंतरावरील मौजा अडम शिवार येथे दिनांक ०४/०३/२०२३ चे २३.०० वा. ते ०५/०३/२०२३ चे ०५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– ईश्वर मधुकरजी बुराडे, वय ३२ वर्ष, रा. अडम, ता. कुही, जि. नागपुर यांनी पोलीस स्टेशन कुही येथे येऊन तक्रार दिली कि, नमुद घटनास्थळी शेताजवळील असलेल्या नाल्याच्या कडेला वाळु टाकलेली १० ते १२ क्विंटल लाल मीर्ची अंदाजे किंमती २,००,०००/–रूपयाचा मुद्देमाल ट्रॅक्टर किंमती अंदाजे ४,००,०००/–रू. असा एकुण ६,००,०००/–रूपयाचा मुद्देमाल आरोपी नामे– १) आदेश मोहन फेंडर, वय २४ वर्ष, रा. वडेगाव व २) सुरज पुंडलिक बोरकुटे, वय २० वर्ष, रा. वडेगाव याने ट्रॅक्टच्या साहाय्याने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. २०७१ हरीदास चाचेरकर पोस्टे कुही मो. नं. ९९२२९०३४८५ हे करीत आहे.

## दुखापत

**१) पो.स्टे. जलालखेडा :–** अंतर्गत रानवाडी येथे दिनांक ५/०३/२०२३ चे १९:०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अंकित जगन बिडीये, बय २२ वर्ष, रा. रानवाडी व आरोपी नामे– मोतीलाल जियालाल खरपुरीया रा. रानवाडी ता. नरखेड हे एकाच गावातील रहीवासी असुन यातील आरोपी हा दारु पिण्याच्या सवईचा असुन नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा घरासमोरील चौकात मित्रा सोबत बसला असता यातील आरोपी हा रस्त्याने शिवीगाळ करीत जात असता फिर्यादी याने आरोपीस म्हटले की तु रस्त्याने शिवीगाळ का करतो असे म्हटले असता यातील आरोपी हा फिर्यादीला शिवीगाळ करीत आला व त्याचे हातात असलेली कापडी पिशवी फिर्यादीच्या डोक्याला डावे साईडला मारल्याने डोके फुटुन रक्त निघाले त्या कापडी पिशवी मध्ये काही तरी जड वस्तु होती त्यामुळे फिर्यादीचे डोके फुटले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक प्रजोक तायडे ब. नं. १९४६ पो.स्टे जलालखेडा मो. नं. ८३०८९६४७१४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. नरखेड :–** अंतर्गत उमरी शिवार येथे दिनांक ०५/०३/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– गणपत गोविद यमने, वय ५२ वर्षे रा. सिदी उमरी व आरोपी नामे– १) भानुदास संपत डोंगरे, वय ४५ वर्ष, २) प्रफुल भानुदास डोंगरे, वय २५ वर्ष, दोन्ही रा. उमरेड यांचे शेत एकमेकांचे शेजारी असुन नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा शेतीची पाहणी करत असता आरोपी क्र. १) याचे जनावरे चरतांना दिसले म्हणुन जनावरांना हकलत असता आरोपी क्र. १ हा तेथे आला व माझे जनावरे कशाला हकलत आहे असे म्हणुन शिवीगाळ केली व तेथीलच काडी उचलुन फिर्यादीच्या कपाळावर मारून जखमी केले तसेच आरोपी क्र. ०२ याने हातबुक्क्याने मारून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भेंडे ब. नं. ६४२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**